# निर्यात प्रयोगांचा संदेश

Authored by म. टा. प्रतिनिधी | महाराष्ट्र टाइम्स • Updated: 16 Sep 2021, 8:01 am

405

अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, देशाच्या निर्यातीतला महाराष्ट्राचा हिस्सा २०१६-१७ नंतर २४ टक्क्यांवरून घसरत २० टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र विचार केला, त...




अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, देशाच्या निर्यातीतला महाराष्ट्राचा हिस्सा २०१६-१७ नंतर २४ टक्क्यांवरून घसरत २० टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र विचार केला, तर मात्र पाच जिल्ह्यांनी गेल्या काही महिन्यांमध्ये तिपटीहून अधिक वाढ नोंदवली आहे...

रूपा नाईक

देशाच्या एकूण निर्यातीमध्ये महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा असला, तरी तो आणखी वाढवण्याची क्षमताही राज्यात निश्चितच आहे. गेल्या पाच वर्षांत निर्यातीत झालेली घसरण थोडीफार थोपवली गेली असली, तरी या बाबत आणखी बरेच प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी पेंड, केळी, कापूस, मक्याचे पीठ अशा उत्पादनांची निर्यातकेंद्री युनिट स्थापन करता येऊ शकतात. राज्याच्या ३६ पैकी भंडारा, परभणी, उस्मानाबाद, बीड आणि चंद्रपूर या पाच जिल्ह्यांनी अलीकडच्या काळात निर्यातीत लक्षणीय वाढ नोंदवली आहे. भंडारा जिल्ह्यातून होणाऱ्या निर्यातीला तांदळामुळे चालना मिळाली आहे. बीड जिल्ह्याने साखरेच्या निर्यातीत वाढ अनुभवली आहे. चंद्रपूर, उस्मानाबादमधून सुती धाग्याची निर्यात वाढली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातून तोफखाना शस्त्रास्त्रांच्या निर्यातीने नफानोंद केली आहे. परभणीत कापूस, मांसाच्या निर्यातीत वाढ झाली.

महाराष्ट्रात निर्यातीवर आधारित उद्योग उभारण्याची गरज आहे. राज्याच्या ३६ जिल्ह्यांत रोजगार हमी योजना, समूह विकास योजना, कौशल्य विकास योजनांच्या धर्तीवर 'एक जिल्हा एक उत्पादन' योजनेवर लक्ष केंद्रित करणे अतिशय आवश्यक आहे. 'मुख्यमंत्री रोजगार योजने'च्या माध्यमातून जिल्ह्यांमध्ये निर्याताभिमुख उद्योगांना प्रोत्साहन देणे, ही काळाची गरज आहे. अकोला, जळगाव, अमरावती, वर्धा, सोलापूर, धुळे व इतर जिल्हे वस्त्र, इतर कृषी मालाच्या निर्यातीचे केंद्र बनू शकतात. यासाठी राज्यात रस्ते, वीज, दळणवळण, निर्यात तपासणी आदी पायाभूत सुविधा भक्कम झाल्या पाहिजेत.

केळी, कापूस, पेंड, मक्याचे पीठ आदींसाठीचे निर्याताभिमुख केंद्र विकसित होण्याचा लाभ महाराष्ट्राच्या पाच आघाडीच्या जिल्ह्यांना झाला आहे. या जिल्ह्यांमधून होणारी निर्यात तीन पटींनी वाढली. बीड, भंडारा, चंद्रपूर, उस्मानाबाद, परभणी जिल्ह्यांचा वाटा ०.३ टक्क्यांवरून वाढला असला, तरी अद्याप तो एक टक्क्यापेक्षा कमी आहे. दर महिन्याला महाराष्ट्रातून होणारी निर्यात तीस टक्क्यांनी वाढून मार्च २०२१ मध्ये ४२ हजार ३४७ कोटी रुपये झाली, तर संपूर्ण देशातील निर्यात २१ टक्क्यांनी वाढून २.१७ लाख कोटी रुपयांवर पोहोचली. राज्यातील पाच जिल्ह्यांच्या निर्यातीचे प्रमुख स्रोत तांदूळ (भंडारा), साखर (बीड), सुती धागा (चंद्रपूर आणि उस्मानाबाद), तोफखाना शस्त्रे (चंद्रपूर) आणि कापूस व मांस (परभणी) राहिले आहे. मार्च २०२१ अखेरच्या सहामाहीत अहमदनगर, धुळे, जालना, लातूर, नांदेड, सांगली, सोलापूर आणि यवतमाळ या आठ जिल्ह्यांमधून निर्यात दुपटीपेक्षा अधिक राहिली. या जिल्ह्यांतून साखर, सुती कापड, पेंड, कॉटन यार्न आणि डेनिम यांची प्रामुख्याने निर्यात झाली.

वाहनांचे सुटे भाग, कापड, यंत्रसामग्री, रसायन, कृषी वस्तू आणि रत्न व दागिने या व्यतिरिक्त साखर, चादरी, ताजी केळी, कापूस, पेंड आदींमध्ये महाराष्ट्र हे आघाडीचे निर्यातदार राज्य आहे. देशाच्या एकूण साखरेच्या निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा ५६ टक्के, मक्याच्या पिठाच्या एकूण निर्यातीत ६८ टक्के, कापसाच्या एकूण निर्यातीत २२ टक्के, चादरींच्या एकूण निर्यातीत ६२ टक्के आणि पेंडीच्या एकूण निर्यातीत २० टक्के वाटा आहे. सोलापूर जिल्ह्याचा भारताच्या चादरींच्या निर्यातीत ६२ टक्के वाटा आहे. अशा प्रकारच्या चादरींचे इतर प्रमुख निर्यात करणारे जिल्हे हसन (कर्नाटक), मदुराई (तमिळनाडू) आणि कन्नूर (केरळ) आहेत. महाराष्ट्राच्या एकूण वस्तुमाल निर्यातीत आणि आर्थिक वाढीमध्ये मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे व रायगड या पश्चिमेकडच्या जिल्ह्यांचे योगदान मोठे आहे. राज्याच्या एकूण वस्तुमाल निर्यातीत या पाच जिल्ह्यांचा वाटा ७१ टक्के आहे. कर्नाटक, हरियाणा, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडूसारख्या निर्यातीतील आघाडीच्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील निर्यातीची प्रादेशिक एकात्मता कमी आहे. गुजरात आणि उत्तर प्रदेशसारख्या अग्रगण्य राज्यांमध्ये विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात निर्यात केंद्रित झालेली नाही. गुजरात आणि उत्तर प्रदेश या राज्यांतील पाच प्रमुख जिल्ह्यांमध्ये केंद्रित असलेल्या निर्यातीचे प्रमाण, एकूण निर्यातीमध्ये अनुक्रमे ६४ व ६५ टक्के आहे. महाराष्ट्रालाही याचे अनुकरण करून, निर्यातीच्या बाबतीतील भौगोलिक केंद्रीकरण कमी करता येऊ शकते.

समूह विकासाच्या दृष्टिकोनातून धुळे, अमरावती, जळगाव, अकोला, यवतमाळ, गडचिरोली आणि हिंगोली येथील निर्याताभिमुख उद्योगांना महाराष्ट्रात प्रोत्साहन मिळू शकते. वस्त्र, अन्नप्रक्रिया अशा निर्यातीची मोठी क्षमता असलेल्या क्षेत्रांप्रमाणे अन्य उद्योगांच्या निर्यातीला उभारी देण्यासाठी राज्य सरकारने 'जिल्हा उद्योग केंद्रा'तील अधिकाऱ्यांची आवश्यक ती मदत घ्यायला हवी. देशाच्या सुती वस्त्रोद्योग निर्यातीत ११ टक्के हिस्सा राखणाऱ्या अमरावती, जळगाव, अकोला जिल्ह्यांमध्ये विशेष (इनक्युबेशन) केंद्र सुरू करायला हवे. कापूस निर्यात करण्याऐवजी, कापसाच्या मूल्यवर्धनासाठी स्थानिक उद्योजकांची क्षमता वाढवली पाहिजे. साखरेच्या निर्यातीतील राज्याचे अव्वल स्थान लक्षात घेता, इथेनॉलवर आधारित जैवइंधनाचे उत्पादन हे महाराष्ट्रातील आणखी एक संभाव्य निर्यात क्षेत्र आहे, यात शंका नाही. राज्य सरकारने साखर कारखान्यांना इथेनॉलच्या प्रभावी उत्पादनासाठी संवर्धन करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. यामुळे बाजारपेठेत मागणी वाढेल.

संबंधित जिल्ह्यांत निर्याताभिमुख उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी दीर्घकालीन प्रकल्प कर्ज आणि कार्यरत भांडवली कर्जे महत्त्वाची आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) अग्रणी बँक योजनेंतर्गत, वित्तीय संस्था त्यांच्या जिल्ह्यांसाठी 'ब्लॉक लेव्हल बँकर्स कमिटी' (बीएलबीसी) द्वारे पत योजनेचे समन्वय करतात. सरकारी बँका, जिल्हा सहकारी बँका, नाबार्ड आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या ब्लॉकअंतर्गत जिल्ह्यांसाठी कर्जनिर्णय समन्वयित करते. जिल्हा उद्योग केंद्राचे महा व्यवस्थापक, पंचायत समित्यांचे प्रतिनिधी, कृषी विद्यापीठांचे कृषी विस्तार अधिकारी यांनीही समितीच्या बैठकांमध्ये सक्रिय सहभाग घ्यायला हवा. हे सारे संभाव्य पतपुरवठ्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. देशाच्या निर्यातीतला महाराष्ट्राचा हिस्सा २०१६-१७ पासून २४ टक्क्यांवरून घसरत २० टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. राज्याला निर्यातीतून मिळणाऱ्या एकूण महसुलापैकी ७१ टक्के महसूल मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांमध्ये केंद्रित झाला आहे. इतर दुर्गम जिल्ह्यांमध्येही निर्यातीला चालना देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. यामुळे एकूण निर्यातीतला राज्याचा घसरलेला हिस्सा परत मिळण्यासही मदत होईल, यात शंका नाही.

(लेखिका एमव्हीआयआरडीसी वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबईच्या कार्यकारी संचालक आहेत.)

# निर्यात प्रयोगांचा संदेश

■ रूपा नाईक

देशाच्या एकूण निर्यातीमध्ये महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा असला, तरी तो आणखी वाढवण्याची क्षमताही राज्यात निश्चितच आहे. गेल्या पाच वर्षांत निर्यातीत झालेली घसरण थोडीफार थोपवली गेली असली, तरी याबाबत आणखी बरेच प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी पेंड, केळी, कापूस, मक्याचे पीठ अशा उत्पादनांची निर्यातकेंद्री युनिट स्थापन करता येऊ शकतात. राज्याच्या ३६ पैकी भंडारा, परभणी, उस्मानाबाद, बीड आणि चंद्रपूर या पाच जिल्ह्यांनी अलीकडच्या काळात निर्यातीत लक्षणीय वाढ नोंदवली आहे. भंडारा जिल्ह्यातून होणाऱ्या निर्यातीला तांदळामुळे चालना मिळाली आहे. बीड जिल्ह्याने साखरेच्या निर्यातीत वाढ अनुभवली आहे. चंद्रपूर, उस्मानाबादमधून सुती धाग्याची निर्यात वाढली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातून तोफखाना शस्त्रास्त्रांच्या निर्यातीने नफानोंद केली आहे. परभणीत कापूस, मांसाच्या निर्यातीत वाढ झाली.

महाराष्ट्रात निर्यातीवर आधारित उद्योग उभारण्याची गरज आहे. राज्याच्या ३६ जिल्ह्यांत रोजगार हमी योजना, समूह विकास योजना, कौशल्य विकास योजनांच्या धर्तीवर 'एक जिल्हा एक उत्पादन' योजनेवर लक्ष केंद्रित करणे अतिशय आवश्यक आहे. 'मुख्यमंत्री रोजगार योजने'च्या माध्यमातून जिल्ह्यांमध्ये निर्याताभिमुख उद्योगांना प्रोत्साहन देणे, ही काळाची गरज आहे. अकोला, जळगाव, अमरावती, वर्धा, सोलापूर, धुळे व इतर जिल्हे वस्त्र, इतर कृषी मालाच्या निर्यातीचे केंद्र बनू शकतात. यासाठी राज्यात रस्ते, वीज, दळणवळण, निर्यात तपासणी आदी पायाभूत सुविधा भक्कम झाल्या पाहिजेत.

केळी, कापूस, पेंड, मक्याचे पीठ आदींसाठीचे निर्याताभिमुख केंद्र विकसित होण्याचा लाभ महाराष्ट्राच्या पाच आघाडीच्या जिल्ह्यांना झाला आहे. या जिल्ह्यांमधून होणारी निर्यात तीन पटींनी वाढली. बीड, भंडारा, चंद्रपूर, उस्मानाबाद, परभणी जिल्ह्यांचा वाटा ०.३ टक्क्यांवरून वाढला असला, तरी अद्याप तो एक टक्क्यापेक्षा कमी आहे. दर महिन्याला महाराष्ट्रातून होणारी निर्यात तीस टक्क्यांनी वाढून मार्च २०२१ मध्ये ४२ हजार ३४७ कोटी रुपये झाली, तर संपूर्ण देशातील निर्यात २१ टक्क्यांनी वाढून २.१७ लाख कोटी रुपयांवर पोहोचली. राज्यातील पाच जिल्ह्यांच्या निर्यातीचे प्रमुख स्रोत तांदूळ (भंडारा), साखर (बीड), सुती धागा (चंद्रपूर आणि उस्मानाबाद), तोफखाना शस्त्रे (चंद्रपूर) आणि कापूस व मांस (परभणी) राहिले आहे. मार्च २०२१ अखेरच्या सहामाहीत अहमदनगर, धुळे, जालना, लातूर, नांदेड, सांगली, सोलापूर आणि यवतमाळ या आठ जिल्ह्यांमधून निर्यात दुपटीपेक्षा अधिक राहिली. या जिल्ह्यांतून साखर, सुती कापड, पेंड, कॉटन यार्न आणि डेनिम यांची प्रामुख्याने निर्यात झाली.

वाहनांचे सुटे भाग, कापड, यंत्रसामग्री, रसायन, कृषी वस्तू आणि रत्न व दागिने याव्यतिरिक्त साखर, चादरी, ताजी केळी, कापूस, पेंड आदींमध्ये महाराष्ट्र हे आघाडीचे निर्यातदार राज्य आहे. देशाच्या एकूण साखरेच्या निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा ५६ टक्के, मक्याच्या पिठाच्या एकूण निर्यातीत ६८ टक्के, कापसाच्या एकूण निर्यातीत २२ टक्के, चादरींच्या एकूण निर्यातीत ६२ टक्के आणि पेंडीच्या एकूण निर्यातीत २० टक्के वाटा आहे. भारताच्या चादरींच्या निर्यातीत सोलापूर जिल्ह्याचा ६२ टक्के वाटा आहे. अशा प्रकारच्या चादरींचे इतर प्रमुख निर्यात करणारे जिल्हे हासन (कर्नाटक), मदुराई (तमिळनाडू) आणि कन्नूर (केरळ) आहेत. महाराष्ट्राच्या एकूण वस्तूमाल निर्यातीत आणि आर्थिक वाढीमध्ये मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे व रायगड या पश्चिमेकडच्या जिल्ह्यांचे योगदान मोठे आहे. राज्याच्या एकूण वस्तुमाल निर्यातीत या पाच जिल्ह्यांचा वाटा ७१ टक्के आहे. कर्नाटक, हरियाणा, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडूसारख्या निर्यातीतील आघाडीच्या राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील निर्यातीची प्रादेशिक एकात्मता कमी आहे. गुजरात आणि उत्तर प्रदेशसारख्या अग्रगण्य राज्यांमध्ये विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात निर्यात केंद्रित झालेली नाही. गुजरात आणि उत्तर प्रदेश या राज्यांतील पाच प्रमुख जिल्ह्यांमध्ये केंद्रित असलेल्या निर्यातीचे प्रमाण, एकूण निर्यातीमध्ये अनुक्रमे ६४ व ६५ टक्के आहे. महाराष्ट्रालाही याचे अनुकरण करून, निर्यातीच्या बाबतीतील भौगोलिक केंद्रीकरण कमी करता येऊ शकते.



**अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार, देशाच्या निर्यातीतला महाराष्ट्राचा हिस्सा २०१६-१७ नंतर २४ टक्क्यांवरून घसरत २० टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. प्रत्येक जिल्ह्याचा स्वतंत्र विचार केला, तर मात्र पाच जिल्ह्यांनी गेल्या काही महिन्यांमध्ये तिपटीहून अधिक वाढ नोंदवली आहे...**

समूह विकासाच्या दृष्टिकोनातून धुळे, अमरावती, जळगाव, अकोला, यवतमाळ, गडचिरोली आणि हिंगोली येथील निर्याताभिमुख उद्योगांना महाराष्ट्रात प्रोत्साहन मिळू शकते. वस्त्र, अन्नप्रक्रिया अशा निर्यातीची मोठी क्षमता असलेल्या क्षेत्रांप्रमाणे अन्य उद्योगांच्या निर्यातीला उभारी देण्यासाठी राज्य सरकारने 'जिल्हा उद्योग केंद्रा'तील अधिकाऱ्यांची आवश्यक ती मदत घ्यायला हवी. देशाच्या सुती वस्त्रोद्योग निर्यातीत ११ टक्के हिस्सा राखणाऱ्या अमरावती, जळगाव, अकोला जिल्ह्यांमध्ये विशेष (इनक्युबेशन) केंद्र सुरू करायला हवे. कापूस निर्यात करण्याऐवजी, कापसाच्या मूल्यवर्धनासाठी स्थानिक उद्योजकांची क्षमता वाढवली पाहिजे. साखरेच्या निर्यातीतील राज्याचे अव्वल स्थान लक्षात घेता, इथेनॉलवर आधारित जैवइंधनाचे उत्पादन हे महाराष्ट्रातील आणखी एक संभाव्य निर्यात क्षेत्र आहे, यात शंका नाही. राज्य सरकारने साखर कारखान्यांना इथेनॉलच्या प्रभावी उत्पादनासाठी संवर्धन करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. यामुळे बाजारपेठेत मागणी वाढेल.

संबंधित जिल्ह्यांत निर्याताभिमुख उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी दीर्घकालीन प्रकल्प कर्ज आणि कार्यरत भांडवली कर्जे महत्त्वाची आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) अग्रणी बँक योजनेंतर्गत, वित्तीय संस्था त्यांच्या जिल्ह्यांसाठी 'ब्लॉक लेव्हल बँकर्स कमिटी' (बीएलबीसी) द्वारे पत योजनेचे समन्वय करतात. सरकारी बँका, जिल्हा सहकारी बँका, नाबार्ड आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या ब्लॉकअंतर्गत जिल्ह्यांसाठी कर्जनिर्णय समन्वयित करते. जिल्हा उद्योग केंद्राचे महा व्यवस्थापक, पंचायत समित्यांचे प्रतिनिधी, कृषी विद्यापीठांचे कृषी विस्तार अधिकारी यांनीही समितीच्या बैठकांमध्ये सक्रिय सहभाग घ्यायला हवा. हे सारे संभाव्य पतपुरवठ्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. देशाच्या निर्यातीतला महाराष्ट्राचा हिस्सा २०१६-१७ पासून २४ टक्क्यांवरून घसरत २० टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. राज्याला निर्यातीतून मिळणाऱ्या एकूण महसुलापैकी ७१ टक्के महसूल मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांमध्ये केंद्रित झाला आहे. इतर दुर्गम जिल्ह्यांमध्येही निर्यातीला चालना देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. यामुळे एकूण निर्यातीतला राज्याचा घसरलेला हिस्सा परत मिळण्यासही मदत होईल, यात शंका नाही.

**(लेखिका एमव्हीआयआरडीसी वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबईच्या कार्यकारी संचालक आहेत.)**